# जिल्हा निवड समिती, सिंधुदुर्ग

## जिल्हा परिषद,सिंधुदुर्ग अंतर्गत पदभरती - 2014

**जाहिरात क्र.सिंजिप/साप्रवि/आस्था1/806/14** **दिनांक-07/06/2014**

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रं.एपिटी-2014/प्र.क्र.48/आस्था-8, दि.25 फेब्रुवारी 2014 अन्वये सन 2014 मंध्ये जुलै महिन्यात जिल्हा परिषदेकडील गट-क व गट-ड च्या रिक्त पदांची भरती प्रक्रिया राबविण्याच्या सूचना आहेत.**

**2. जिल्हा परिषद सिंधुदुर्ग अंतर्गत गट क व गट ड रिक्त पदांच्या अनुषंगाने खालील परिच्छेद 04 मंध्ये नमूद केलेप्रमाणे सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून फक्त ऑनलाईन पद्दधतीने अर्ज मागविण्यात येत आहे. खालील परिच्छेद 04 मधील अ.क्रं. 01 ते 17 मधील पदे गट-क ची आहेत. तर अ.क्र. 18 ते 19 मधील पदे गट-ड मधील आहेत. पदभरतीसाठी पदनिहाय सामाजिक व समांतर आरक्षणाचा तपशिल परिच्छेद 04 मधील विवरणपत्रात नमूद केलेला आहे. परिच्छेद 05 मधील विवरणपत्रात पदांच्या शैक्षणिक अर्हता व प्रश्नपत्रिकेचा दर्जा इ.माहिती तसेच परिच्छेद 06 लेखी परिक्षेचे स्वरुप तसेच परिच्छेद 07 मंध्ये परीक्षेचा दिनांक व परीक्षेची वेळ इ. माहिती अंतर्भूत केली आहे. तरी पात्र उमेदवारांनी सोबत दिलेल्या विहित नमुन्यातच अर्ज करणेचे आहेत.**

**3. गट-क मधील पदांसाठी उमेदवारांची निवड जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचे अध्यक्षतेखालील जिल्हा निवड समितीमार्फत केली जाईल. तर गट-ड मधील पदांसाठी उमेदवारांची निवड मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांचे अध्यक्षतेखालील जिल्हा निवड समितीमार्फत केली जाईल. ज्या उमेदवारांनी उपसंचालक, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र सिंधुदुर्ग, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण, जिल्हा-रायगड, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी सिंधुदुर्ग, सहाय्यक आयुक्त समाजकल्याण सिंधुदुर्ग इ. कार्यालयात नावाची नोंदणी केली असेल त्यांनीही पात्र असल्यास विहित शुल्क भरुन या पदांसाठी फक्त ऑनलाईन पद्दधतीने अर्ज करणे आवश्यक राहील.**

**4.** सरळसेवा भरतीने भरावयाची पदे

| अ.क्र | पदाचा सवर्ग | सामाजिक व अपंग प्रवर्ग | प्रत्यक्षात रिक्त पदे | संभाव्य रिक्त पदे | एकूण रिक्त पदे | **समांतर आरक्षण** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | महिला | माजी सैनिक | अंशकालीन बेरोजगार | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | खेळाडू | समांतर आरक्षण विरहित |
| 1 | **कृषि अधिकारी** | **खुला** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| 2 | **विस्तार अधिकारी (कृषि)** | **अनु जमाती** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| 3 | **कनिष्ठ लेखाधिकारी** | **खुला** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| 4 | **वरिष्ठ सहाय्यक (लेखा)** | **अनु जाती** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **अनु.जमाती** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **विमाप्र** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **अपंग** | **01** | **--** | **01** | **श्रवणशक्तीतील दोष -HH (Hearing Handicap) पात्र (श्रवणशक्तीतील दोष डेसीबलसह प्रमाणपत्रात नमूद असणे आवश्यक)** |

| अ.क्र | पदाचा सवर्ग | सामाजिक व अपंग प्रवर्ग | प्रत्यक्षात रिक्त पदे | संभाव्य रिक्त पदे | एकूण रिक्त पदे | **समांतर आरक्षण** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | महिला | माजी सैनिक | अंशकालीन बेरोजगार | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | खेळाडू | समांतर आरक्षण विरहित |
| 5 | **कनिष्ठ सहाय्यक (लेखा)** | **वि जा (अ)** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| 6 | **कनिष्ठ अभियंता (विद्युत)** | **अनु. जाती** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **खुला** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| 7 | **कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी)** | **अनु जाती** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **अनु.जमाती** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **खुला** | **02** | **--** | **02** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| 8 | **स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक** | **अनु जाती** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **अनु जमाती** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **वि जा अ** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **भ ज (ब)** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **भ ज (क)** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **भ ज (ड)** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **इमाव** | **02** | **--** | **02** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **खुला** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| 9 | **विस्तार अधिकारी (पंचायत/स.क./ एग्रावियो)** | **खुला** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| 10 | **कंत्राटी ग्रामसेवक** | **अनु जमाती** | **04** | **--** | **04** | **01** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **02** |
| | | **वि जा अ** | **03** | **--** | **03** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **02** |
| | | **भ ज क** | **01** | **01** | **02** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **भ ज ड** | **--** | **01** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **विमाप्र** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **इमाव** | **06** | **01** | **07** | **02** | **01** | **01** | **--** | **--** | **--** | **03** |
| | | **खुला** | **06** | **02** | **08** | **02** | **01** | **01** | **--** | **--** | **--** | **04** |
| | | **अपंग** | **02** | **--** | **02** | **(किमान40 % अपंगत्व) (1) क्षीणदृष्टी - LV पात्र (Low Vision) -01 पद<br>2) श्रवणशक्तीतील दोष -HH (Hearing Handicap) पात्र -01 पद (श्रवणशक्तीतील दोष डेसीबलसह प्रमाणपत्रात नमूद असणे आवश्यक)** | | | | | | |

| अ.क्र | पदाचा सवर्ग | सामाजिक व अपंग प्रवर्ग | प्रत्यक्षात रिक्त पदे | संभाव्य रिक्त पदे | एकूण रिक्त पदे | **समांतर आरक्षण** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | महिला | माजी सैनिक | अंशकालीन बेरोजगार | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | खेळाडू | समांतर आरक्षण विरहित |
| 11 | **लघुलेखक (उच्चश्रेणी)** | **अनु.जाती** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| 12 | **विस्तार अधिकारी (सांख्यिकी)** | **भ.ज (क)** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **इमाव** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| 13 | **लघुटंकलेखक** | **खुला** | **--** | **01** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| 14 | **वरिष्ठ सहाय्यक (लि)** | **अनु.जाती** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **अनु.जमाती** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **वि जा (अ)** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **खुला** | **--** | **01** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| **15** | **आरोग्य पर्यवेक्षक** | **अनु.जाती** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **अनु.जमाती** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| **16** | **औषध निर्माता** | **अनु.जमाती** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **खुला** | **06** | **--** | **06** | **02** | **01** | **01** | **--** | **--** | **--** | **02** |
| **17** | **आरोग्य सेवक (महिला)** | **अनु.जाती** | **04** | **--** | **04** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **03** |
| | | **अनु.जमाती** | **07** | **--** | **07** | **--** | **01** | **01** | **--** | **--** | **--** | **05** |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **विजा (अ)** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **भ ज (क)** | **02** | **--** | **02** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **भ ज (ड)** | **02** | **--** | **02** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **इमाव** | **02** | **01** | **03** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **02** |
| | | **विमाप्र** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **खुला** | **07** | **02** | **09** | **03** | **01** | **01** | **--** | **--** | **--** | **04** |

| अ.क्र | पदाचा सवर्ग | सामाजिक व अपंग प्रवर्ग | प्रत्यक्षात रिक्त पदे | संभाव्य रिक्त पदे | एकूण रिक्त पदे | **समांतर आरक्षण** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | महिला | माजी सैनिक | अंशकालीन बेरोजगार | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | खेळाडू | समांतर आरक्षण विरहित |
| 18 | **परिचर (वर्ग - 04)** | **अनु.जाती** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **अनु.जमाती** | **03** | **--** | **03** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **02** |
| | | **विजा अ** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **भ.ज. क** | **01** | **01** | **02** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **खुला** | **24** | **01** | **25** | **08** | **04** | **--** | **01** | **01** | **01** | **10** |
| 19 | **स्त्री परिचर (वर्ग - 04)** | **अनु.जमाती** | **01** | **--** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **भ ज ड** | **--** | **01** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **इमाव** | **02** | **--** | **02** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| | | **खुला** | **--** | **01** | **01** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **01** |
| **एकूण** | | | **121** | **14** | **135** | **28** | **11** | **05** | **01** | **01** | **01** | **85** |
| **सूचना- अपंग प्रवर्गाची 03 पदे स्वतंत्रपणे दर्शविणेत आलेली असून सदर पदासाठी कोणत्याही प्रवर्गातील उमेदवार अर्ज करु शकतील.** | | | | | | | | | | | | |

5. **पदांबाबत शैक्षणिक अर्हता व प्रश्नपत्रिकेचा दर्जा**

| अ.क्र. | पदाचे नांव | वेतनश्रेणी | शैक्षणिक अर्हता | प्रश्नपत्रिकेचा दर्जा |
|---|---|---|---|---|
| 1 | कृषि अधिकारी | 9300-34800 (4400 ग्रेड वेतन) | मान्यताप्राप्त कृषि विदयापिठाची पदव्युत्तर पदवी (एम्.एस्.सी) मंध्ये किमान द्वितीय श्रेणी किंवा कृषि विदयापिठाच्या पदवी परीक्षेत किमान बी एस् सी (कृषि /उद्यानविद्या), बी.टेक (ॲग्री.इंजिनियरींग) | मराठी 12 वी दर्जा व कृषि संबधी प्रश्न पदवी दर्जाची परीक्षा |
| 2 | विस्तार अधिकारी (कृषि) वर्ग-3 | 9300-34800 (4200 ग्रेड वेतन) | मान्यताप्राप्त कृषि विदयापीठाची पदवी किंवा कृषि विदयापिठाच्या पदवी परीक्षेत किमान बी एस् सी (कृषि /उद्यानविद्या), बी.टेक (ॲग्री.इंजिनियरींग) | मराठी 12 वी दर्जा व कृषि संबधी प्रश्न पदवी दर्जाची परीक्षा |

| अ.क्र. | पदाचे नांव | वेतनश्रेणी | शैक्षणिक अर्हता | प्रश्नपत्रिकेचा दर्जा |
|---|---|---|---|---|
| 3 | कनिष्ठ लेखाधिकारी | 9300-34800 (4200 ग्रेड वेतन) | 1) मान्यताप्राप्त विदयापीठाची पदवी<br>2) कोणतेही सरकारी कार्यालय, व्यापारी भागीदारी संस्था अथवा स्थानिक प्राधिकरण यातील लेखा कार्याचा किमान पाच वर्षाचा अखंड सेवेचा अनुभव किंवा<br>3) गणित अथवा सांख्यिकी अथवा लेखा शास्त्र व लेखा परीक्षा हे प्रमुख विषय घेवून पदव्युत्तर पदवी धारण करणे आवश्यक | मराठी 12 वी दर्जा, लेखा संबधी इतर प्रश्न पदवी दर्जाची परीक्षा |
| 4 | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | 5200 - 20200 (2400 ग्रेड वेतन) | 1) मान्यताप्राप्त विदयापीठाची पदवी<br>2) कोणतेही सरकारी कार्यालय, व्यापारी भागीदारी संस्था अथवा स्थानिक प्राधिकरण यातील लेखा कार्याचा किमान तीन वर्षाचा अखंड सेवेचा अनुभव किंवा<br>3) लेखा शास्त्र व लेखा परीक्षा हे प्रमुख विषय घेवून वाणिज्य शाखेची प्रथम किंवा द्वितीय श्रेणीची पदवी धारण करणे आवश्यक | मराठी 12 वी दर्जा, लेखा संबधी इतर प्रश्न पदवी दर्जाची परीक्षा |
| 5 | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | 5200 - 20200 (1900 ग्रेड वेतन) | 1)माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण आणि<br>2)महाराष्ट्र शासनाच्या शासकिय कर्मचा-यांची मराठी टंकलेखन व लघुलेखन यातील परीक्षा घेण्यासाठी असलेल्या एतदर्थ मंडळाने किंवा आयुक्त शासकिय परीक्षा विभाग शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य यांनी मराठी व इंग्रजी टंकलेखनाचे दर मिनीटास 30 शब्द या गतीने दिलेले प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक किंवा<br>3)टंकलेखनामंध्ये 50 टक्के गुण मिळवून माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक | सर्व विषय एस. एस.सी दर्जाची परीक्षा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 6 | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | 9300-34800 (4300 ग्रेड वेतन) | विद्युत अभियांत्रिकी या विषयातील मान्यता प्राप्त पदवी किंवा पदविका (3 वर्षाचा पाठयक्रम) | मराठी 12 वी दर्जा व विद्युत अभियांत्रिकी संबधी प्रश्न, पदवी दर्जाची परीक्षा |
| 7 | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | 9300-34800 (4300 ग्रेड वेतन) | यंत्र अभियांत्रिकी या विषयातील मान्यता प्राप्त पदवी किंवा पदविका (3 वर्षाचा पाठयक्रम) | मराठी 12 वी दर्जा व यंत्र अभियांत्रिकी संबधी प्रश्न, पदवी दर्जाची परीक्षा |

| अ.क्र. | पदाचे नांव | वेतनश्रेणी | शैक्षणिक अर्हता | प्रश्नपत्रिकेचा दर्जा |
|---|---|---|---|---|
| 8 | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | 5200-20200 (2400 ग्रेड वेतन) | 1. एस एस सी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>2. शासकिय तांत्रिक संस्थेकडील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाची 01 वर्ष मुदतीचा पाठयक्रम परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक किंवा<br>अ. आर्किटेक्चरल ड्रॉफ्टस्मन (वास्तुशास्त्रीय आरेखक)<br>ब. कन्स्ट्रक्शन सुफरवायझर (बांधकाम पर्यवेक्षक) किंवा<br>आरेखक (स्थापत्य) दोन वर्षाचा पाठयक्रम उत्तीर्ण | एस एस सी परीक्षा उत्तीर्ण, शासकिय तांत्रिक संस्थेकडील स्थापत्य अभियांत्रिकी संबधी प्रश्न, पदवी दर्जाची परीक्षा |
| 9 | विस्तार अधिकारी (पंचायत/समाजकल्याण/ एग्राावियो) | 9300-34800 (4200 ग्रेड वेतन) | मान्यताप्राप्त विदयापीठाची पदवी | मराठी 12 वी दर्जा व इतर पदवी दर्जाची परीक्षा |
| 10 | कंत्राटी ग्रामसेवक | 1)एकत्रित रु.6000/- | (एक) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र किंवा तुल्य अर्हता आणि कृषि विषयाची पदविका (दोन वर्षाचा अभ्यासक्रम) धारण करीत असतील, किंवा | सर्व विषय एस. एस.सी दर्जाची परीक्षा व कृषी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | मानधन<br>2) 03 वर्षानंतर वेतनश्रेणी 5200 - 20200<br>(2400ग्रेडवेतन) | (दोन) किमान उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य अर्हता परीक्षेत किमान 60 टक्के गुणासह उत्तीर्ण<br>किंवा<br>शासनमान्य संस्थेची अभियांत्रिकी पदविका (तीन वर्षाचा अभ्यासक्रम)<br>किंवा<br>(तीन) शासनमान्य संस्थेची समाजकल्याणची पदवी (बी.एस.डब्ल्यू)<br>आणि<br>संगणक हाताळणी /वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवळी विहित केलेल्या परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहिल. | पदविका दर्जाचे प्रश्न |
| 11 | लघुलेखक (उच्चश्रेणी) | 9300-34800 (4400 ग्रेड वेतन) | आयुक्त शासकीय परीक्षा विभाग,शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य पुणे यांनी दिलेले किंवा या नियमांच्या प्रयोजनार्थ शासनाकडून विनिर्देशपूर्वक मान्यता देण्यांत आलेल्या अन्य कोणत्याही संस्थेने दिलेले मराठी लघुलेखनातील दर मीनिटास 120 शब्दाहून कमी नसेल इतक्या गतीचे आणि इंग्रजी टंकलेखनातील दर मीनिटास 40 शब्दाहून व मराठी टंकलेखनातील दर मीनिटास 30 शब्दाहून कमी नसेल इतक्या गतीचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहिल. | सर्व विषय एस एस सी दर्जाची परीक्षा |
| 12 | विस्तार अधिकारी (सांख्यिकी) | 9300-34800 (4200 ग्रेड वेतन) | मान्यताप्राप्त विद्यापिठाची विज्ञान,कृषि,वाणिज्य किंवा वाङःमय शाखेची अर्थशास्त्र किंवा गणित अथवा सांख्यिकी विषयासह प्रथम अगर द्वितीय वर्गातील पदवी धारण करणे आवश्यक. | मराठी बारावी दर्जा व इतर पदवी दर्जाची परीक्षा |

| अ.क्र. | पदाचे नांव | वेतनश्रेणी | शैक्षणिक अर्हता | प्रश्नपत्रिकेचा दर्जा |
|---|---|---|---|---|
| 13 | लघुटंकलेखक | 5200-20200 (2400 ग्रेड वेतन) | आयुक्त शासकिय परीक्षा विभाग, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी दिलेले किंवा या नियमांच्या प्रयोजनार्थ शासनाकडेन विनिर्देशपूर्वक मान्यता देणेत येईल अशा इतर संस्थेने दिलेले मराठी लघुलेखनातील दर मिनिटास 80 शब्दाहून कमी नसेल इतक्या गतीचे आणि इंग्रजी टंकलेखनातील दर मिनीटास 40 शब्दाहून कमी नसेल व मराठी टकलेखनातील दर मिनीटास 30 शब्दाहून कमी नसेल इतक्या वेगाचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहिल. | सर्व विषय एस एस सी दर्जाची परीक्षा |
| 14 | वरिष्ठ सहाय्यक (लि) | 5200-20200 (2400 ग्रेड | मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी धारण करणे आवश्यक. | मराठी बारावी दर्जा व इतर पदवी दर्जाची |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | वेतन) | | परीक्षा |
| 15 | आरोग्य पर्यवेक्षक | 9300-34800 (4200 ग्रेड वेतन) | 1)शास्त्र शाखेतील सांविधानिक विदयापीठाची पदवी आणि<br>2)बहुउद्देशीय आरोग्य सेवकासाठीचा 12 महिन्यांचा पाठयक्रम यशस्विरित्या पूर्ण केलेले असणे आवश्यक | मराठी 12 वी दर्जा , विज्ञान व आरोग्य संबधी प्रश्न,पदवी दर्जाची परीक्षा |
| 16 | औषध निर्माता | 5200-20200 (2800 ग्रेड वेतन) | शासन मान्य डी. फार्मसी कोर्स उत्तीर्ण व रजिस्ट्रेशन आवश्यक. | सर्व विषय एस्.एस्.सी. दर्जाची परिक्षा व औषधशास्त्र संबंधी प्रश्न |
| 17 | आरोग्य सेवक (महिला) | 5200-20200 (2400 ग्रेड वेतन) | महाराष्ट्र नर्सींग कौन्सिल यांची मान्यता असलेल्या संस्थेचा सहाय्यक परिचारिका प्रसाविका (ए.एन.एम) 18 महिन्याचा कोर्स उत्तीर्ण व रजिस्ट्रेशन आवश्यक | एस्.एस्.सी. दर्जाची परिक्षा व आरोग्य सेवाविषयक प्रश्न |
| 18 | परिचर / स्त्री परिचर (वर्ग 4 ) | 4440-7440 (1300 ग्रेड वेतन) | मान्यताप्राप्त कोणत्याही प्राथमिक शाळेची कमीत कमी इयत्ता 4 थी उत्तीर्ण | इयत्ता 04 थी दर्जा |

**06. <u>लेखी परीक्षेचे स्वरुप</u>**

| अनु. क्र | संवर्ग | मराठी संबधीत गुण | | इंग्रजी संबधीत गुण | | सामान्यज्ञान संबधीत गुण | | बुद्धिमापन संबधीत गुण | | गणित संबधित गुण | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | -- | -- | प्रश्न | गुण |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कृषि अधिकारी | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | -- | -- | 100 | 200 |
| 2 | विस्तार अधिकारी (कृषि) | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | -- | -- | 100 | 200 |
| 3 | कनिष्ठ लेखाधिकारी | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | -- | -- | 100 | 200 |
| 4 | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | -- | -- | 100 | 200 |
| 5 | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | -- | -- | 100 | 200 |
| 6 | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | -- | -- | 100 | 200 |
| 7 | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | -- | -- | 100 | 200 |
| 8 | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | -- | -- | 100 | 200 |
| 9 | विस्तार अधिकारी (पंचायत/ समाजकल्याण/ एग्रावियो) | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | -- | -- | 100 | 200 |
| 10 | कंत्राटी ग्रामसेवक | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | -- | -- | 100 | 200 |
| 11 | लघुलेखक (उच्चश्रेणी) | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | -- | -- | 100 | 200 |
| 12 | विस्तार अधिकारी (सांख्यिकी) | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | -- | -- | 100 | 200 |
| 13 | लघुटंकलेखक | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | -- | -- | 100 | 200 |
| 14 | वरिष्ठ सहाय्यक (लि) | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | -- | -- | 100 | 200 |
| 15 | आरोग्य पर्यवेक्षक | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | -- | -- | 100 | 200 |
| 16 | औषध निर्माता | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | -- | -- | 100 | 200 |
| 17 | आरोग्य सेवक (महिला) | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | -- | -- | 100 | 200 |
| 18 | परिचर/स्त्री परिचर | 25 | 25 | 0 | 0 | 25 | 25 | 0 | 0 | 25 | 25 | 75 | 75 |

**07. परिक्षेचा दिनांक, परिक्षेची वेळ , याबाबतची माहिती खालीलप्रमाणे**

| अक्र | पदाचे नांव | परिक्षेचा दिनांक | परिक्षेची वेळ |
|---|---|---|---|
| 1 | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | 06/07/14 | 10.00 ते 11.30 |
| 2 | कृषि अधिकारी | 06/07/14 | 10.00 ते 11.30 |
| 3 | विस्तार अधिकारी (कृषि) वर्ग-3 | 06/07/14 | 10.00 ते 11.30 |
| 4 | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | 06/07/14 | 10.00 ते 11.30 |
| 5 | औषध निर्माता | 12/07/14 | 10.00ते 11.30 |
| 6 | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | 12/07/14 | 10.00 ते 11.30 |
| 7 | आरोग्य सेवक (महिला) | 12/07/14 | 2.00 ते 3.30 |
| 8 | कंत्राटी ग्रामसेवक | 13/07/14 | 10.00 ते 11.30 |
| 9 | आरोग्य पर्यवेक्षक | 13/07/14 | 10.00 ते 11.30 |
| 10 | विस्तार अधिकारी (पंचायत/समाजकल्याण/ एग्रावियो) | 13/07/14 | 02.00 ते 03.30 |
| 11 | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | 13/07/14 | 02.00 ते 03.30 |
| 12 | वरिष्ठ सहाय्यक (लि) | 20/07/14 | 10.00 ते 11.30 |
| 13 | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | 20/07/14 | 2.00 ते 3.30 |
| 14 | लघुलेखक (उच्चश्रेणी) | 26/07/14 | 10.00 ते 11.30 |
| 15 | विस्तार अधिकारी (सांख्यिकी) | 26/07/14 | 10.00 ते 11.30 |
| 16 | लघुटंकलेखक | 26/07/14 | 10.00 ते 11.30 |
| 17 | कनिष्ठ लेखाधिकारी | 26/07/14 | 2.00 ते 3.30 |
| 18 | परिचर (वर्ग-4) | 26/07/14 | 2.00 ते 3.30 |
| 19 | स्त्री परिचर | 26/07/14 | 2.00 ते 3.30 |

**<u>सर्व पदांकरिता समान सूचना</u>**

1. **भरतीप्रक्रियेसंदर्भातील आवश्यक माहिती व सूचना https://zpsindhudurg.maharashtra.gov.in या जिल्हा परिषद सिंधुदुर्गच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल.**
2. उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी / रहिवाशी असावा. वरील पदांसाठी आवश्यक अर्हता प्राप्त करणारा महाराष्ट्र राज्यातील कोणताही उमेदवार अर्ज करु शकतो.
3. रिक्त पदांच्या संख्येत कमी जास्त बदल होण्याची शक्यता आहे. मा.सहाय्यक आयुक्त (मावक) कोकण विभाग यांचेकडील तपासणीस अधीन राहून बिंदुनामावलीनुसार रिक्त पदे दर्शविण्यांत आलेली आहेत. त्यांचेकडील तपासणीच्या अधीन राहून रिक्त पदांच्या अनुषंगाने नियुक्त्या देण्यांत येतील. याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. तसेच परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, सामाजिक, समांतर आरक्षण यात बदल करणे, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशत: बदल करणे इ. बाबतचे सर्व अधिकार गट-क पदांबाबत अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी,सिंधुदुर्ग यांना राहतील व गट-ड पदांबाबत अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सिंधुदुर्ग तसेच शासनास राहतील.
4. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरताना वस्तुनिष्ठ व अचूक माहिती भरावी. ऑनलाईन भरलेल्या माहितीच्या आधारे (मूळ कागदपत्र तपासणीच्या अधीन राहून) उमेदवाराची गुणवत्तेनुसार निवड करण्यांत येईल. तसेच निवड केल्यानंतर उमेदवाराने पुरविलेली माहिती खोटी असल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे नंतर निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची निवड तात्काळ रद्द करण्यांत येईल. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज करताना आपल्या शैक्षणिक व इतर बाबींची पूर्ण माहिती नमूद करावी. ऑनलाईन भरलेल्या माहितीच्या व्यतिरिक्त इतर गुणवत्ता व माहितीची प्रमाणपत्रे / कागदपत्रे नंतर कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.
5. उमेदवार एका पेक्षा अधीक पदांसाठी अर्ज करणेस इच्छूक असलेस प्रत्येक पदांसाठी स्वतंत्र ऑनलाईन पद्दधतीने अर्ज करणे आवश्यक आहे.
6. उपरोक्त पदभरतीच्या नियम / निकषामंध्ये पद भरती पूर्ण होईपर्यत शासन अधिसूचना / निर्णय / परिपत्रक / पत्रानुसार बदल होवू शकतो.
7. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रंमांक प्रानिमं-2007/प्र.क्र.46/07/13-अ, दि.27/06/2008 मधील अ. क्र.05 नुसार गट - क च्या पदांसाठी गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवाराने एकूण गुणांच्या किमान 45 टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.
8. उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. उमेदवाराकडे अधीवास प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास त्याने नियुक्तीपूर्वी कागदपत्र पडताळणीच्या वेळी अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.
9. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, परिपत्रक दि. 14 जानेवारी 2011 व साप्रवि परिपत्रक दि. 18 एप्रिल 2013 अन्वये अपंग उमेदवारांना सेवेत नियुक्ती देण्यापूर्वी शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैदयकिय मंडळामार्फत तपासणी केल्यानंतर त्यांना नियुक्ती देण्यांत येईल.
10. **अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू-** शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय दि. 30 एप्रिल 2005 अन्वये सदर पदांसाठी त्या त्या खेळांच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रिडा स्पर्धामंध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धात प्रथम, व्दितीय व तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू, राज्य अजिंक्यपद स्पर्धा या सदर खेळांच्या महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनने स्वत: आयोजित केलेल्या असवाव्यात. किमान प्राविण्यापेक्षा उच्च स्तरावरील क्रिडा प्राविण्य मिळविणा-या उमेदवारास प्राधान्य असेल. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धामंध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंचा यासाठी विचार केला जाणार नाही. तसेच राष्ट्रीय छात्रसेनेमंध्ये (NCC) अंडर ऑफिसरची रँक

मिळवून राष्ट्रीय छात्रसेनेच्या राष्ट्रीय स्पर्धामंध्ये पदके प्राप्त केलेली व्यक्ती पात्र असेल. तसेच आरक्षणासाठी मान्यताप्राप्त क्रिडा प्रकार हा उपरोल्लिखीत शासन निर्णय दि. 30 एप्रिल 2005 मधील तक्ता-अ मधील सहपत्राप्रमाणे असेल.

**11.** शासन निर्णय क्रं.बीसीसी2011/प्र.क्रं 1064/2011/16-ब, दि.12 डिसेंबर 2011 अन्वये सरळसेवा भरतीमध्ये ज्या उमेदवारांची निवड मागासप्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदावर झाली आहे, अशा उमेदवारांनी नियुक्ती आदेश प्राप्त झालेनंतर नियुक्तीच्या आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. उपरोक्त उमेदवार यांना जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती देणेत येणार असलेने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव कार्यालयाकडे तात्काळ सादर करणेचा असून पोहोच पावतीची सांक्षांकित प्रत नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे सादर करणेची आहे. तथापि याबाबत याचिका क्रं.2136/2011 व अन्य याचिकांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाने दिनांक 25 ऑगष्ट 2011 रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय,दिल्ली येथे एसएलपी दाखल करण्यात आलेली असून मे. सर्वोच्च न्यायालयाकडून प्राप्त होणा-या आदेशाच्या अधीन राहून नियुक्ती आदेश देणेत येतील.

**12.** शासनाचे वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांक अनियो /1005/1026/ सेवा 04/ दिनांक 31 ऑक्टोबर 2005 नुसार दिनांक 1 नाव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर ज्यांची शासकिय सेवेत नियुक्ती होईल त्यांना नवीन परिभाषिक निवृत्ती वेतन योजना लागू राहील .

**13.** पदांची उपलब्ध संख्या सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेता लेखी परिक्षेत गुणवत्तेच्या आधारे निवडलेल्या किंवा समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत दिनांक 27/06/2008 च्या शासन निर्णयातील परि. 6 नुसार कार्यवाही करणेत येईल

**14.** विवाहित महिला उमेदवारांनी पूर्वाश्रमीच्या नावाने (By Birth) अर्ज करणे आवश्यक आहे.

**15.** निवडणूक वा नैसर्गिक आपत्ती या कारण मुळे विहित दिवशी लेखी परीक्षा घेणे शक्य नसेल तर सोयीच्या रविवारी ती परीक्षा घेणेत येईल.

**16.** उमेदवारांना लेखी परीक्षेस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. उपस्थितीबाबत त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रवासभाडे अथवा भत्ता देय राहणार नाही.

**17.** लेखी परीक्षेत मिळालेले गुण आणि आरक्षित प्रवर्ग विचारात घेवून शासनाने विहित केलेल्या प्रमाणात पात्र उमेदवारांची यादी घोषित करण्यांत येईल. संपूर्ण निवड प्रक्रिया लेखी परीक्षेच्या दिनांकापासून पाच दिवसात (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून) पूर्ण होणे अपेक्षित असल्याने पदांसाठी कागदपत्र पडताळणीचा दिनांक जिल्हा परिषद,सिंधुदुर्ग च्या प्रशासकिय भवनात नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यांत येईल. तसेच याबाबतची माहिती सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. कोणत्याही उमेदवाराला वैयक्तिक पत्राद्वारे कळविले जाणार नाही. त्यामुळे परीक्षेसंबधी आवश्यक माहिती जाणून घेणे ही उमेदवारांची वैयक्तिक जबाबदारी राहिल. (अपरिहार्य कारणास्तव अथवा जिल्हा निवड समितीचे नियंत्रणाबाहेरील कारणास्तव निवड प्रक्रियेस जास्त कालावधी लागू शकतो.)

18. भरती प्रक्रिये सदर्भातील सर्व अंतिम निर्णय जिल्हा निवड समितीचे राहतील.

19. कोणत्याही अर्जदाराने त्याची निवड करण्यासाठी निवड समितीवरील अध्यक्ष , सदस्य तसेच अधिका-यांवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष राजकिय अथवा अन्य प्रकाराने दबाव आणल्यास अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्याला निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यांत येईल.

20. गट-क व गट-क पदांकरिता मुलाखती नसलेने निवडसूची प्रसिद्ध झाल्यानंतर उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची तपासणी करणेत येईल. तपासणीवेळी उमेदवाराने पदासाठीची आवश्यक कागदपत्रे सादर न केल्यास किंवा उमेदवार पदासाठी अपात्र ठरत असल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करणेत येवून प्रतिक्षा सूचीवरील उमेदवाराची नियुक्तीसाठी निवड करणेत येईल.

21. सदर परीक्षेस ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरताना उमेदवारांना कोणतीही कागदपत्रे सादर करणेची आवश्यकता नसली तरीही ज्या उमेदवारांकडे पदाकरिता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी अर्ज करु नये.

22. निवड समितीने तयार केलेली निवडसूची एक वर्षासाठी किंवा निवड सूची तयार करताना ज्या दिनांकापर्यतची रिक्त पदे विचारात घेण्यांत आली आहे त्या दिनांकापर्यत यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यत विधिग्राहय राहील. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

**23.** ज्या पदांच्या लेखी परीक्षा एकाच दिवशी व एकाच वेळी आहेत अशा पदांबाबत उमेद्वार कोणत्याही एकाच पदासाठी अर्ज करु शकतो. दोन्ही पदासाठी अर्ज केल्यास संबंधित उमेद्वार एका पदाच्या अपात्रतेबाबत वैयक्तीक रित्या जबाबदार राहील.

24. **कंत्राटी ग्रामसेवक :-** अ) कंत्राटी ग्रामसेवकांना लागू असलेल्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत विहीत नमुन्यातील हमीपत्र दिल्यावरच कंत्राटी ग्रामसेवक म्हणुन नियुक्ती देण्यात येईल. ब) कंत्राटी ग्रामसेवक म्हणुन नियुक्ती दिलेल्या उमेदवाराला दरमहा रुपये 6000/- एकत्रित मानधन दिले जाईल

क) ज्या उमेदवारांची कंत्राटी ग्रामसेवक म्हणुन नियुक्ती होईल त्याला नियुक्ती स्विकारणेपुर्वी रक्कम रु. 10,000/- (रु.दहा हजार फक्त )इतकी सुरक्षा अनामत ठेव जिल्हा परिषदेकडे ठेवावी लागेल.

ड) ग्रामसेवकांची नियुक्ती कंत्राटी पद्धतीवर तीन वर्षाच्या कालावधीसाठी करण्यात येईल. तीन वर्षांनंतर नेमणूक आपोआप संपुष्टात येईल.तीन वर्षाचा कंत्राटी कालावधी समाधानकारक रित्या पुर्ण केल्यानंतरच मंजूर पदांच्या उपलब्धतेनुसार सेवा नियमित करुन ग्रामसेवक पदाची नियमित वेतनश्रेणी मंजूर केली जाईल.

25. **वयोमर्यादा :-**

1) जाहिरातीत नमूद सर्व पदांसाठी उमेदवाराचे वय जाहिरातीच्या दिनांकास 18 वर्षा पेक्षा कमी नसावे तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवारांसाठी 33 वर्षा पेक्षा जास्त नसावे . मागासवर्गियांसाठी उच्चतम वयोमर्यादा 5 वर्षासाठी शिथिलक्षम.

2) अपंग , प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त यांचेसाठी 45 वर्षा पर्यंत वयोमर्यादा राहील.

3) स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन 1991 चे जनगणना कर्मचारी सन 1994 नंतरचे निवडणूक कर्मचारी उमेदवाराचे वय 45 वर्षे राहिल.

4) खेळाडू आरक्षणासाठी खेळाडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवून सदर पदासाठी असलेल्या वयोमर्यादेत 5 वर्षापर्यत वयाची अट शिथीलक्षत राहील.

5) माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग 3 व वर्ग 4 मधील पदांसाठी नेमणूकीकरिता विहित वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधीक 3 वर्षे इतकी राहील. तसेच अपंग माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग 3 व वर्ग 4 मधील पदांसाठी नेमणूकीकरिता कमाल वयोमर्यादा 45 वर्षे राहील.

6) पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन बेरोजगार उमेदवारांसाठी 46 वर्षे वयोमर्यादा राहील.

अपंग, प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त उमेदवारांसाठी सदर वयोमर्यादा सरसकट शिथील केली असल्याने मागासवर्गीय अपंग,माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त उमेदवारांनाही 45 वर्षापर्यतचीच सवलत राहील. तसेच पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन बेरोजगार उमेदवारांसाठी सदर वयोमर्यादा सरसकट शिथील केली असल्याने मागासवर्गीय पदवीधर/पदविधारक अंशकालीन उमेदवारांनाही 46 वर्षापर्यतचीच सवलत राहील.

7) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत असलेल्या कर्मचा-यांचे बाबत कमाल वयोमर्यादा 45 वर्षे राहील.

**27. संगणक अर्हता :-** शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक प्रशासन 2000/ प्र.क्र. 5/ 2001/ 32 / दिनांक 20/07/2002 अनुषंगिक सुधारीत शासन निर्णयान्वये उपरोक्त पदांसाठी **(कंत्राटी ग्रामसेवक वगळून)** अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी संगणक हाताळणी बाबतचे खालील नमूद केलेले प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांका पासून दोन वर्षाचे आत प्राप्त करणे आवश्यक राहिल अन्यथा त्यांची सेवा समाप्त होईल.

1) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत 'C.C.C' किंवा 'O' स्तर किंवा 'A' स्तर किंवा 'B' स्तर किंवा 'C' स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र **किंवा**

2) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

**28. अंतिम निवडसूची व प्रतिक्षासूचीमंध्ये निवड झालेल्या उमेदवारांनी कागदपत्र तपासणीवेळी पात्रतेबाबत सादर करावयाची कागदपत्रे**

1. उमेदवार ज्या समांतर आरक्षणामधून अर्ज करीत असेल त्या समांतर आरक्षणाबाबतचे सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
2. महिला आरक्षणाबाबत महिला व बालकल्याण विभाग शासन निर्णय दिनांक 25 मे 2001 मधील तरतूदीनुसार खुल्या प्रवर्गातील महिलांना 30% महिला आरक्षणाचा लाभ घेणेसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेयर ) सन 2013-14 हया कालावधीकरिता वैध असलेले (अर्थात दिनांक 1/4/2013 पासून अथवा तद्नंतर निर्गमित केलेले) सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
3. शासन परिपत्रक दिनांक 5 जून 2006 नुसार अनुसूचित जाती व जमाती वगळता इतर प्रवर्गातील मागासवर्गीय उमेदवार उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमिलेयर) सन 2013-14 हया कालावधीकरिता वैध असलेले (अर्थात दिनांक 1/4/2013 पासून अथवा तद्नंतर निर्गमित केलेले) सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.
4. शासनाचे सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक 26/08/2005 नुसार लहान कुटुंब असल्याचे प्रतिज्ञापत्र ऑनलाईन अर्जासोबत भरणे आवश्यक आहे. अर्जदार अविवाहित असला तरी प्रमाणपत्र भरणे आवश्यक असून अविवाहित असे नमूद करुन प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
5. शासनाचे सामान्य प्रशासन विभाग कडील शासन परिपत्रक क्रमांक मकसी 1007/ प्र. क्र 36/ का. 36 दिनांक 10 जुलै 2008 अन्वये महाराष्ट्र कर्नाटक सिमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगीतलेल्या 865 गांवातील मराठी भाषिक उमेदवारांना वरिल पदासाठी अर्ज करता येईल. तथापि त्यांनी सदर 865 गांवातीलच रहिवासी असल्याबाबतचा त्यांच्या वास्तव्याचा सक्षम प्राधिकाऱ्यांचा विहित नमुन्यातील दाखला सादर करणे अनिवार्य राहिल.
6. पदवीधर पदविकाधारक अंशकालिन उमेदवाराने शासकिय कार्यालयात तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामंध्ये अनुभवाची नोंद केल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

7. शैक्षणिक अर्हतेसंबधी गुणपत्रक व प्रमाणपत्र, शैक्षणिक व व्यावसायीक परिक्षा उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र, नावातील बदलाबाबत पुराव्याचे कागदपत्र, वय, अधीवास दाखला, टंकलेखन/लघुलेखन प्रमाणपत्र, अनु.जाती व अनु.जमाती वगळून अन्य मागासवर्गीय उमेदवार यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेबाबत आवश्यक नॉन क्रिमिलेअर दाखला, जात प्रमाणपत्र व असल्यास जातवैधता प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त/ भूकंपग्रस्त , अपंग , खेळाडू, या पदांसाठी आरक्षण मागीतलेल्या उमेदवारांनी सक्षम प्राधिका-याचा दाखला व जाहिरातीत नमूद पदासांठी आवश्यक तद्अनुषंगीक दाखले , इत्यादीच्या साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे.
8. माजी सैनिक समांतर आरक्षणाची मागणी करणा-या उमेदवार यांनी जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची प्रत किंवा तत्संबधीची कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.
9. शासकिय / निमशासकिय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज नियुक्ती प्राधिकारी यांच्या परवानगीने भरले असल्यास परवानगीची प्रत सादर करणे आवश्यक आहे.
10. उमेदवाराच्या नावात बदल झाला असल्यास त्या पृष्ठर्थ्य संबधित शासन राजपत्राची प्रत.
11. सिंधुदुर्ग जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केलेली असल्यास त्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर करावी.

## 29.**ऑनलाईन अर्ज करावयाची कार्यपद्दधती व सूचना**

1. उमेदवाराने संपूर्ण जाहीरात काळजीपूर्वक वाचावी.
2. ज्या पदासाठी उमेदवार ऑनलाईन अर्ज भरणार आहे त्या पदाची शैक्षणिक पात्रता, त्यासाठी आवश्यक वयोमर्यादा व इतर अनुषंगिक माहिती जाहीरातीमध्ये काळजीपूर्वक वाचावी.
3. सर्व पात्र उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज या कार्यालयाच्या **https://**zpsindhudurg.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर तसेच **http://eforms.org.in/zpsindhudurg2014** या संकेतस्थळावर **दिनांक-09.06.2014 ते दिनांक-23.06.2014** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतीम दिनांक व वेळेनंतर संकेतस्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद करण्यात येईल.
4. या कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळ https://zpsindhudurg.maharashtra.gov.in **तसेच http://eforms.org.in/zpsindhudurg2014** या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज पूर्ण माहिती भरल्यानंतर फॉर्म अंतिमतः जमा करता येईल. फॉर्म जमा केल्यानंतर भारतीय स्टेट बॅकेत शुल्क भरण्याबाबतचे चलन उपलब्ध होईल. सदर चलनाची प्रिंट काढून त्या चलनामार्फतच उमेदवाराने चलनात नमूद असलेले आवश्यक ते शुल्क भारतीय स्टेट बॅंकेच्या कोणत्याही शाखेमध्ये पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी भरावे. उमेदवाराने आवश्यक शुल्क भरल्याची खात्री करावी. उमेदवाराने परिपूर्ण अर्ज भरल्यानंतर अर्जाची प्रिंट स्वत: काढावी व ती आपल्या माहितीसाठी जतन करुन ठेवावी. **फॉर्म जमा केल्यानंतर परीक्षा शुल्क भरणे अनिवार्य आहे, अन्यथा आपला अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.**
5. सदर परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. कोणत्याही उमेदवाराने इतर कोणत्याही प्रकारे या कार्यालयास अर्ज सादर केल्यास सदर अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच यापूर्वी अर्ज सादर केला असल्यास त्याची दखल घेतली जाणार नाही व त्या अर्जास या कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारचे उत्तर देखील दिले जाणार नाही. या संदर्भात कोणत्याही उमेदवाराच्या तक्रारीची या कार्यालयाकडून दखल घेतली जाणार नाही.
6. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक कागदपत्रे वा अन्य कोणतेही शैक्षणिक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र जोडण्याची आवश्यकता नाही.( केवळ सही व फोटो स्कॅन करून अपलोड करावा. तसेच माजी सैनिक उमेदवारांनी त्यांना कार्यमुक्त केलेल्या प्रमाणपत्राची प्रत स्कॅन करून अपलोड करावी.) अपलोड करताना फोटोची व सहीची प्रत्येकी साईज 35 केबीपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्याच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही चूका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास व भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. व याबाबत उमेदवारास कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहीरातीत नमूद केलेल्या सर्व अटी, तसेच शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथिलीकरण वगैरेची पात्रता तपासूनच अर्ज सादर करावा.

7. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी सर्व आवश्यक कागदपत्रे व स्वत:चा अलीकडच्या काळातील पासपोर्ट फोटो स्वत: जवळ असल्याची खात्री करावी. अर्ज भरतेवेळी फोटो व सही स्कॅन करुन संकेतस्थळावरील सूचनेनुसार अपलोड करणे आवश्यक राहील. ऑनलाईन अर्ज अचूक भरणेची जबाबदारी अर्जदार यांची राहील व त्याअनुषंगाने कोणतीही तक्रार नंतर विचारात घेतली जाणार नाही.
8. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रात नाव नोंदणीकेली असली तरी देखील वरील पदांसाठी रितसर ऑनलाईन अर्ज अधिकृत संकेतस्थळावर करणे, परीक्षा शुल्क बँकेत भरणे आवश्यक आहे.
9. ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराजवळ स्वत:चा वापरात असलेला ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे.
10. उमेदवाराने अर्जासोबत माहिती सादर करताना कार्यान्वीत असलेला भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक व ई-मेल आयडी नमूद करावा, जेणेकरुन आपणास संपर्क करुन आवश्यक ती माहिती देणे सुलभ होईल. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जाव्दारे नोंदविलेला भ्रमणध्वनी व ई-मेल आयडी हा अपूर्ण अथवा चुकीचा असल्यास, तसेच मोबाईल क्रमांक NCPR Registered (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रियेदरम्यान त्याव्दारे पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील, तसेच याव्दारे संदेशवहनात येणा-या तांत्रिक अडचणींना अध्यक्ष, जिल्हा निवड समिती हे जबाबदार असणार नाहीत. या कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी सूचना देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत रहाण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.
11. ज्या उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे आणि आवश्यक आवेदन शुल्क मुदतीत अदा केले आहे व संपूर्ण माहिती भरुन प्रिंट काढली आहे, त्यांना लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र (हॉल तिकीट) त्याच्या लॉग इन आयडी व्दारे अधिकृत संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन प्राप्त करुन घेता येईल. कोणत्याही उमेदवारास पोस्टाने प्रवेशपत्र पाठविले जाणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच प्रवेशपत्राशिवाय कोणत्याही उमेदवारास परीक्षेसाठी प्रवेश दिला जाणार नाही. सदरचे प्रवेशपत्र परिक्षा दिनांकाच्या 6 दिवस अगोदर संकेस्थळावर उपलब्ध होईल.
12. उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरण्यात काही अडचणी आल्यास त्यांनी **02362-228817 / 9168930404** या क्रमांकावर संपर्क साधावा.
13. अर्जामध्ये नमूद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास संबंधित उमेदवार कारवाईस पात्र राहील. तसेच चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास संबंधित उमेदवार तात्काळ सेवेतून काढून टाकणेस पात्र राहील व तो भारतीय दंड संहितेच्या कलम 199 व 200(2) प्रमाणे कारवाईस पात्र राहील.
14. **ऑन लाईन पदभरतीचा अर्ज/चलन/प्रवेशपत्राबाबतचे वेळापत्रक**

| अ.क्र. | भरती पक्रिया कार्यक्रम | सर्व पदांकरीता |
|---|---|---|
| 1 | ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याचा कालावधी | दिनांक-**09/06/2014** रोजी सकाळी **10.00** वाजलेपासून ते **23/06/2014** रोजी सायंकाळी **5.45** वाजेपर्यंत |
| 2 | भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये विहीत चलनाव्दारे परीक्षा शुल्क जमा करण्याचा कालावधी | दिनांक- **10/06/2014** ते दिनांक- **24/06/2014** (भारतीय स्टेट बँकेच्या कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत) |
| 3 | लेखी परीक्षेसाठी प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा कालावधी | लेखी परीक्षा दिनांकाच्या 6 दिवस अगोदर |

**इतर सूचना**

1. उमेदवारांनी उत्तरे लिहीण्यासाठी अथवा चिन्हांकीत करण्यासाठी फक्त काळया शाईच्या बॉलपेनचा वापर करण्याचा आहे. अन्य कोणत्याही साधनाचा वापर केल्यास संबंधित उत्तरपत्रिका तपासली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.
2. उमेदवाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेला बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.
3. प्राथमिक छाननीअंती ज्या उमेदवारांचे अर्ज नाकारण्यात आलेले नाहीत, अशा उमेदवारांना लेखीपरीक्षेसाठी तात्पुरता प्रवेश दिला जाईल.
4. <u>**परीक्षा शुल्काची आकारणी व शुल्क भरणा प्रक्रिया**</u>

**सदर भरती प्रक्रियेत खालीलप्रमाणे शुल्क आकारले जाणार असून सदर परीक्षा शुल्क हे ना परतावा राहील.**

| **अ.क्र.** | **परीक्षेचा प्रकार** | **आवश्यक परीक्षा शुल्क** | |
|---|---|---|---|
| | | **राखीव प्रवर्ग** | **खुला प्रवर्ग** |
| 1 | लेखी परीक्षा | **200** | **300** |
| **माजी सैनिकांसाठी परीक्षा शुल्क नाही** | | | |

वर दर्शविण्यात आलेले परीक्षा शुल्क हे बँक प्रोसेसिंग चार्जेस वगळून आहे. याशिवाय संबंधित बँकेकडून जे प्रक्रिया शुल्क आकारले जाईल, ते प्रक्रिया शुल्क उमेदवाराने भरावयाचे आहे.

5. माजी सैनिकांसाठी परीक्षा शुल्क नाही. मात्र त्यासाठी त्यांनी सैनिकी सेवेचा पदावधी पूर्ण केल्याबाबतच्या कार्यमुक्त पत्राची साक्षांकीत प्रत स्कॅन करुन ऑनलाईन उपलोड करणे बंधनकारक आहे. सदर कार्यमुक्त पत्राची प्रत सादर न केल्यास वर नमूद केल्याप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील.
6. सदर शुल्क हे बॅक प्रोसेसिंग चार्जेस वगळून आहे. (बँक प्रोसेसिंग शुल्क रु.60/- वरील शुल्काशिवाय भरावे लागेल.
7. उक्त परीक्षा शुल्क हे भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत ऑनलाईन अर्ज भरताना प्राप्त झालेल्या विहीत चलनाव्दारेच रोखीने भरणे आवश्यक आहे.
8. परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह परीक्षा सुरु होण्यापूर्वी एक तास अगोदर उपस्थित रहाणे आवश्यक आहे. उशीरा येणा-या व प्रवेशपत्र न आणणा-या उमेदवारांना परीक्षेकरीता प्रवेश दिला जाणार नाही. तसेच उमेदवारांनी स्वत:चे फोटो असलेले ओळखपत्र उदा. वाहन परवाना, पॅन कार्ड, निवडणूक ओळखपत्र, आधार कार्ड, इ. सोबत आणणे बंधनकारक राहील.

सही/-
**सदस्य (गट-क)अध्यक्ष(गट-ड) जिल्हा निवड समिती तथा**
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

सही/-
**अध्यक्ष जिल्हा निवड समिती (गट-क) तथा**
जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग